Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

Original Article

# प्रौढ प्रताप चक्रवर्ती श्री राजा हंबीरराव याचा नांदगाव येथील शिलालेख शके १२८९ (इ.स. १३६७-६८)

**श्री. अनिकेत अशोक पाटील**
**मुरुड–जंजिरा , रायगड**
Mail – aniket.patil168@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180315
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 3(A)
Pp. 82-87
March- 2026
**Submitted:** 25 Feb. 2026
**Revised:** 03 Mar. 2026
**Accepted:** 10 Mar. 2026
**Published:** 31 Mar. 2026

**सारांश –**

सदर शोधनिबंध रायगड जिल्ह्यातील , मुरुड तालुक्यात असणाऱ्या नांदगाव मध्ये सापडलेल्या राजा हंबीरराव यांच्या शिलालेखा संदर्भात आहे. हा शिलालेख सुमारे १४ व्या शतकात तयार करण्यात आला असून हे एक दानपत्र आहे. आज पर्यंत राजा हंबीरराव यांचे केवळ चार शिलालेख उपलब्ध असून राजा हंबीरराव यांच्या संदर्भातील हा पाचवा शिलालेख अतिशय महत्त्वाचे साधन आहे.

सदर शिलालेख हा एक गधेगळ स्वरूपातील ऐतिहासिक साधन असून त्यावर सुमारे २३ ओळींचा देवनागरी लिपीतील लेख आहे. तसेच या लेखाखाली गाढव व स्त्री यांच्या संभोगाचे चिन्ह कोरण्यात आले आहे. लेखात मुरुड तसेच नांदगाव या गावाचे उल्लेख आलेले असून राजा हंबीरराव यांचा प्रधान सिहीप्रो याने जमिनीच्या स्वरुपात केलेले दान येथे नमूद करण्यात आले आहे. राजा हंबीररावाचा इतर शिलालेखांप्रमाणे या शिलालेखातही राजा हंबीरराव यांना “कोकण चक्रवर्ती” हे बिरूद लावलेले दिसून येते.

ऐतिहासिक महत्व पाहता हा शिलालेख म्हणजे कोकणच्या इतिहासात भर घालणारा तसेच रायगड जिल्हयातील नांदगाव या गावाचे महत्त्व दर्शविणारा महत्वाचा दुवा आहे.

बीजशब्द ***(Keywords)*** – हंबीरराव, सिहीप्रो, नांदगाव, ठाणेकोकण इ.

**परिचय –**

शिलाहार किंवा यादव राज्यकर्त्यांच्या कालखंडात उत्तर कोकणातील ‘मरुत्क्षेत्र’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुरुडचे ऐतिहासिक महत्व हे याआधीही उपलब्ध ताम्रपट, शिलालेख इत्यादी साधनांद्वारे अधोरेखित झाले आहे. त्या इतिहासात भर घालणारा हा शिलालेख एक महत्वाचा पुरावा आहे.

प्रस्तुत शिलालेख नांदगाव, तालुका मुरुड , जिल्हा रायगड येथे राहणाऱ्या श्री. जनार्दन चोरघे ( भवानी पाखाडी ) यांच्या नारळ सुपारीच्या वाडीत (खाजगी जागेत) विहिरीशेजारी आहे. सदर संशोधन पत्रात या शिलालेखाचे मोजमाप व वाचन (सदर अभ्यास कार्य चोरघे कुटुंबियांच्या संपूर्ण परवानगीने केले आहे ) दिले आहे. पुढील लेखातून निश्चितपणे मुरूड व नांदगावच्या इतिहासतील विविध पैलू उलघडण्यास मदत होणार आहे. शिलालेखाचे वाचन करीत असताना असे लक्षात येते की, शिलालेखाचा कालखंड शके १२८९ म्हणजेच इ.स. १३६७ असून हा शिलालेख महाराजा हंबीरराव यांच्या कारकिर्दीत कोरण्यात आला आहे. या शिलालेखात राजा हंबीरराव यांचा उल्लेख प्रौढप्रताप चक्रवर्ती महाराजाधीराज हंबीरराव म्हणून करण्यात आला आहे. आज मितीस राजा हंबीरराव यांचे केवळ ४ शिलालेख ( देवनार - BARC मुंबई, रानवड - उरण, भिमेश्वर मंदिर नागाव , वाघ्रण ता.अलिबाग इ. ) उपलब्ध असून त्याचे वाचन पूर्वीच झालेले आहे. नांदगावचा शिलालेख हा हंबीररावांच्या संदर्भातील पाचवा शिलालेख आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
प्रमोद राऊत, सहाय्यक प्राध्यापक ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी.

**How to cite this article:**
*पाटील, . अनिकेत . अशोक .* (2026). *प्रौढ प्रताप चक्रवर्ती श्री राजा हंबीरराव याचा नांदगाव येथील शिलालेख शके १२८९ (इ.स. १३६७-६८).* Journal of Research & Development, 18(3(A)), 82–87.
https://doi.org/10.5281/zenodo.19607467

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.19607467
OPEN ACCESS

JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT ISSN: 2230-9578

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026




हंबीरराव यांच्या सापडलेल्या शिलालेखांची स्थाने

नांदगावचे स्थानिक असलेले चोरघे कुटुंबीय हे माझ्या पाटील घराण्याचे कौटुंबिक परिचयाचे असल्याने या घराण्याकडे माझे पूर्वापार येणे - जाणे आहे. हा शिलालेख मी स्वत: अगदी लहानपणापासून पाहत आलो आहे. कुतुहलाने व उत्सुकतेपोटी मी या शिलालेखाचे वाचन सुरु केले.

**शिलालेखाचे विश्लेषण –**


श्री. चोरघे कुटुंबीय यांच्या गेल्या कित्येक पिढ्या नांदगाव याच ठिकाणी वास्तव्यास आहेत. स्वतःच्या खाजगी जागेत कित्येक वर्षे नारळ व सुपारीचे उत्पादन घेत आहेत. वाडीला जलसिंचन करण्यासाठी वाडीमध्ये विहीर उपलब्ध आहे. इ.स. २००० च्या सुमारास विहिरीतील गाळ काढून विहीर स्वच्छ करीत असताना एक भली मोठी शिळा स्वच्छता करणाऱ्यांना सापडली. ही शिळा विहिरीतून बाहेर काढुन विहिरी लगतच ठेवण्यात आली. कित्येक वर्ष दुर्लक्षित असलेली ही शिळा नंतर काही काळ दैवी आकृती म्हणून पुजली देखील जात होती.

१. शिलालेखाचे स्थान – ऐतिहासिक दंडाराजपुरी म्हणजेच आताच्या मुरुड जंजिरा, जिल्हा रायगड पासून उत्तर दिशेला ८ कि.मी. अंतरावर असणाऱ्या नांदगाव या गावातील भवानी पाखाडी येथे वास्तव्यास असणाऱ्या श्री. जनार्दन चोरघे यांच्या नारळ सुपारीच्या खाजगी वाडीत शिलालेख आहे. ही मालमत्ता आता श्री. राकेश जनार्दन चोरघे सांभाळतात.

२. भौतिक वर्णन – नांदगाव येथील शिलालेख हा बेसाल्ट दगडावर कोरलेला आहे. उपलब्ध शिलालेख हा गेली काही वर्ष ऊन वर पाऊस यांच्या संपर्कात आल्याने शिलालेख काही प्रमाणात अस्पष्ट झाला आहे. सदर शिळा ही गधेगळ प्रकारातील आहे. सदर शिळेचे तीन भागात विभाजन केले असता शिळेच्या वरच्या भागात चंद्र - सूर्य व मध्यभागी मंगल कलश अशा आकृत्या काढलेल्या आहेत . शिळेच्या वरील भागात असलेल्या चंद्र व सूर्य ही चिन्हे लेखाची शाश्वतता किंवा स्थिरता दर्शवतात तर मध्यभागी असणारा कलश हा लेखाचे मांगल्य दर्शवितो. शिळेच्या मध्य भागात २३ ओळींचा लेख लिहिला असून अंत्य (खालील) भागात गाढव व स्त्रीचे संकरशिल्प कोरण्यात आले आहे. हे शिल्प कोरण्यात अगदी बारकाईने केलेली कलाकुसर जाणवत नाही. अगदी साधारणपणे हे शिल्प कोरण्यात आले आहे. ज्यामध्ये गाढव व स्त्री संभोग अवस्थेत आहेत. शिल्पातील स्त्री वाकलेली असून तिच्यावर असणारे गाढव शेपटी उंचावून आपल्या खाली असणाऱ्या स्त्री सोबत संभोग अवस्थेत दाखवलेले आहे. अशी एकूणच गधेगळची रचना आहे. गधेगळच्या खालील दगड मोकळा सोडून देण्यात आला आहे.

सदर शिळेचे अक्षांश व रेखांश नुसार स्थान १८.३९२३५५ , ७२.९२६४३८ आहे. शिळेची लांबी व रुंदी अनुक्रमे ५६ इंच व २३ इंच असून सदर शिळा सुस्थितीत आहे. शिळेवरील स्त्री व गाढवाचे संकर शिल्प सुमारे १० इंच × ९ इंच आहे. बरीच अक्षरे व ओळी मानवी हस्तक्षेपामुळे (जसे या शिळेचा वापर काही काळ धुणी धुण्यासाठी केला जात होता) नष्ट झालेली आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026





नांदगाव येथील शिलालेखाचे चित्र व छायाचित्र

**लेखन पद्धती, भाषा व अक्षर ओळख –**

सदर लेखात वापरत आलेली लिपी ही यादवकालीन शिलालेखांवर आढळणाऱ्या देवनागरी लेखन पद्धतीशी मिळती - जुळती आहे. मात्र लेखनातील काही अक्षरांवर मोडी लिपीचा प्रभाव जाणवतो. लेखनामध्ये काही प्रमाणात जोडाक्षरांचा देखील समावेश आढळतो. लेखातील कु, रु,च, श, मु, थ, भ, ध, ज इत्यादी अक्षरांची वळणे विशेष उल्लेखनीय आहेत. बहुतांश प्रमाणात लेख मराठी भाषेतच आहे मात्र काही प्रमाणात फारसी भाषेतील शब्दांचा उल्लेख लेखात आलेला आहे. लेखातील पहिल्याच ओळीत ' हिजरत ' हा कालदर्शक शब्द शुद्ध फारसी असून हिजरी पद्धतीच्या कालगणनेत हा शब्द वापरला जातो .

सदर शिलालेखाची लेखन पद्धती ही भीमेश्वर मंदिर ,नागाव येथील शिलालेखाशी मेळ खाते. तसेच बरेचसे शब्द दोन्हीही शिलालेखात समान असलेले आढळतात. नागाव येथील शिलालेखा प्रमाणे नांदगाव येथील शिलालेखात देखील ‘ ल ’ऐवजी ‘ ळ ’ या अक्षराचा वापर प्रामुख्याने केलेला जाणवतो. ' प्राचीन मराठी कोरीव लेख ' या ग्रंथात शं. गो. तुळपुळे ( लेख क्र.५५ ) यांनी म्हटल्याप्रमाणे नागाव येथील हंबीररावांच्या शिलालेखात, २० व्या ओळीत ' चोरलेवाडी ' हा शब्द सोडल्यास या लेखात 'ल' अक्षर कोठेही आलेले नाही. मात्र नागाव शिलालेखात देखील २० व्या ओळीतील चोरलेवाडी शब्दातील ' ल ' अक्षर हे संशयास्पद वाटत आहे. असे असले तरीही उर्वरित दोन (देवनार व रानवड ) शिलालेखांचा विचार करता ‘ल ‘ अक्षराचा वापर स्पष्ट पणे केलेला आढळतो. राजा हंबीरराव यांच्या नांदगाव येथिल शिलालेखात नांदगाव येथील अधिकाऱ्याचे नाव ‘अली’ असे आलेले आहे. हे नाव यावनी आहे. तसेच लेखात भाई दातारू किंवा भाई नाक ही नावे आढळतात. या नावांमागे लावलेले ‘भाई‘ हे उपपद हे हिंदुस्थानी भाषेतील आहे असे मत श्री. तुळपुळे यांनी नागाव शिलालेखाच्या संदर्भात मांडले होते. निधान भाई हे उपपद मराठी नाही हे नक्की आहे.

**काळ निश्चिती -**

प्रस्तुत लेखात , पहिल्या ओळीत कालखंडाचा उल्लेख शक संवत व हिजरत या दोन्ही पद्धतीने केला आहे. हिजरी सन ७६९ नमूद केले असून शके १२८९ , पळवंग संवत्सर नमूद केले आहे. दोन्ही नमूद कालखंडाचा अभ्यास करून असे लक्षात येते की, हा शिलालेख ख्रिस्ती वर्ष सन १३६७-६८ मध्ये कोरण्यात आला आहे. तसेच शिलालेखात उल्लेख केलेला पळवंग किंवा प्लवंग संवत्सर हे देखील नमूद केलेल्या वर्षाशी मिळते आहे.हंबीररावांच्या इतर प्रकाशित लेखांप्रमाणे या लेखात सुद्धा कुठेही पक्ष , तिथी किंवा वार याचा उल्लेख आलेला नाही. मात्र उल्लेखलेल्या कालगणने नुसार हा १४ व्या शतकातील मुरुड तालुक्यात सापडलेला पहिलाच शिलालेख आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026



**आशय व चर्चा**

प्रस्तुत शिलालेख हा हिजरी सन ७६९ म्हणजेच शके १२८९ (इ.स. १३६७-६८) चा असून या शिलालेखात ठाणेकोंकण येथे राज्य करीत असणाऱ्या हंबीरराव या राजाचा उल्लेख " श्रीमत्य प्रौढिप्रताप चक्रवर्ती महाराजाधिराज " असा आढळतो. इ.स. १३०० च्या सुमारास लिहिलेल्या यादव राजा रामचंद्रदेव यांच्या आगासन येथील शिलालेखात " कोंकणसंबंधठाणा " असा उल्लेख सापडतो. तसेच सन १३४० च्या सुमारास इब्न बतूता या अरब प्रवाशाने "कोकण ताना" असा उल्लेख आपल्या 'रहेला' या पुस्तकात केला आहे. सदर लेखात राजा हंबीरराव यांना लावण्यात आलेले बिरुद हे प्रामुख्याने देवगिरीचे यादव वंशातील राजे आपल्या नावाला लावत असल्याचे दिसून येते. जसे ' प्रौढिप्रतापचक्रवर्ति ' हे बिरुद यादव राजा रामचंद्रदेव याच्या अक्षी, चौल, आगासन, कोपराड, येथील शिलालेखात लावण्यात आले आहे. तर ' महाराजाधिराज ' हे बिरुद प्रामुख्याने उत्तरेचे शिलाहार राजे लावीत असल्याचे दिसून येते. उदा. शिलाहार राजा सोमेश्वर याचे रानवड व चांजे येथील शिलालेख, द्वितीय अनंतदेव याचा वसई शिलालेख, द्वितीय अपरादित्याचा परळ येथील शिलालेख , इ. एकंदरीत राजा हंबीरराव हे शिलाहार राज्यकर्त्यांसोबतच यादव राजे वापरत असलेली बिरुदे स्वतः लावत असल्याचे दिसून येते. तसेच हा शिलालेख एक धर्मपत्र आहे . या लेखाचा उल्लेख "धरमादि पत्र" असा उल्लेख शिलालेखात आला आहे.

राजा हंबीररावांचा उल्लेख, सदर शिलालेखात देवनार येथील शिलालेखाप्रमाणे "ठाणेकोंकणमाहिमेबिंबस्थाने" असा आला नसला तरीही उपलब्ध तिन्हीही शिलालेखांप्रमाणे "ठाणे कोंकण राज्यं क्रोती" म्हणजेच ठाणे कोकणवर राज्य करणारा असा आला आहे. तसेच नागाव व देवनार येथील शिलालेखाप्रमाणे "महाराजाधिराज" असे बिरूद देखील लावण्यात आले आहे.

हंबीररावांचा चा प्रमुख प्रधान किंवा मंत्री ' सिहीप्रो ' ज्याचा उल्लेख सर्वव्यापारी म्हणून करण्यात आला आहे. फळभोगासाहित वाड्या विकत घेऊन त्या दान केल्याचा उल्लेख सापडतो. सिहीप्रो याने समंध नांदिगौ म्हणजेच नांदगाव आगरपैकी एक वाडी फळ भोगासहित विकत घेऊन दान केली किंवा वाटून टाकली. त्यावाडीच्या विक्रीची किंमत ४०० द्राम एवढी होती. ही किंमत अदा करून राम जोईसि, क्रिष्ण जोईसि, कुम जोईसि या तिघांमध्ये समान वाटून दिले व त्यांच्या बालगोपाळांनी म्हणजेच मुलाबाळांची ते वाटून घेतले. भविष्यात जर कोणी त्या वाडी संबंधी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्यास सर्व आगऱ्यांनी मिळून त्या गोष्टीचे निवारण करावे असा सिहीप्रोचा धर्म असून तो सर्वांनी पाळावा. सदर शिलालेखात आलेला आगरी हा शब्द जातीवाचक नसून नांदगाव आगरात राहणाऱ्या रहिवाश्याना उद्देशून असावा.

शिलालेख देवनागरी लिपीतील असला तरीही मुसलमानी राजसत्तांच्या सहवासाची थोडीफार छाया येथे उमटलेली दिसते. याचे कारण म्हणजे मुसलमानी सत्तांचा कोकणात वाढत चाललेला प्रभाव तसेच परदेशी व्यापाराचा कोकण किनाऱ्याशी घनिष्ट संबंध अगदी पूर्वीपासूनच होता. संपूर्ण शिलालेखाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, सदर शिलालेख हे दानपत्र आहे. शिलालेखातील बरेचसे शब्द अस्पष्ट व वाचनायोग्य नसल्याने संपूर्ण शिलालेखाचा अर्थ उलगडण्यास अडथळा येतो.

**शिलालेखाचे वाचन**

१. छ स्वस्ति श्री हिजरत ७ ६ ९ सकु संवतू १ २ ८ ९ पळवंग सवसरे आद्येय श्रीमत्य प्रौ-

२. ढिप्रताप चक्रवर्ती महाराजाधिराज श्री हंबिरुराऊ ठाणेकोंकण राज्यं क्रोती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

३. सत्यतस्मिनकाळे प्रवर्तमाने धरमादि पत्रळिखिते यथा सर्व व्यापारि सिहिप्रो ति

४. निरोपित राजकुरिआचा चकार दारू दादा ताशआ समंध नांदिगौ आगरुपैकि

५. अधिकारि अलि समद वरतकु भाईदतारु जना 3 जादाडि ठाडि × × भाठारि

६. सिहिप्रो दाताळित थ धरमा तांद्योळ बाळवि कुळि राज कृतिआच्याना प्रति

७. दाध × × × × × × पौकीचा × × वाडी १ ससिम फळ भोगा सहित दाई कोणि येई कोन मनामत

८. दाइक म ×जोईसि × कुजिव × गि जाईते श्रीरायाजा भाप्ररि सिहिप्रो वाडि विकति ठाडाई-

९. ळिजा दाडि माडि धरमा दाताळी वाडि × (स)वअ सासण पत्रापौकि भाई वर्तकाचे आदाम केतवे आ-

१०. चा चे ×रिति वाडि विक्रिता दत्य दामा सते ४०० हे दाम राम जोईसि क्रिष्ण जोईसि कुम जोईसि

११. हे जन ३ मुष्य करोनी समथि वाडी विक्रिता सिहिप्रोक्रित अधिलवाटा वराहताहि वाडी सत्या

१२. तिवितिळीत गुंती हसि करुति सिहिप्रो ळ×ति विकति दिधळि वाडि कोण्ही दातारु आ

१३.थ ठमटेळीत गुंती करि समग्रि आगरिचाई प्रतिपाळावे हा धरमु सिहिप्रोचा नितर्वकू समथि आ-

१४. गरिचा × × × × × मु ळे × × × × × सिहिप्रो × जा ति प्रा जा ता वाडिळि धाकुटा बाळ गोपा-

१५. ळि भोगावंशे × × × × आगरिया दा × × × प्रतिपाळावा आहिपाळक आधिकारि आ × स ×

१६. वरतकु भाई दातारू × × × × × × × दातारु होळकरी × × × नागवशे गंगाधर भटे मुरुडो रमजो

१७. ई सिवाधतभट ग णे × सि × भट× × × × × भटचा वि × भट दा× भटचा दोदा दातारु × ×

१८. म्हा भ नकु को × चा × × × × × × × × × × × × × × × × × भट हरिमण पंडित माहा

१९. स म थि को ×× मि चा दे × × × × × × × × × × × × चा × × × × × म नाकू सिरिदेव नाकाचा ध र

२०. ती प्रतीपाळक कु× सिहनाकाचा × × × × × × × × × × मुष्य करूनि समथि आगरिचे आहिपाळक अंप्रा-

२१. शे सासि चेउळ पैकि गणपती ताकुळी वतैक नागनाकचा मरुड पैकि होळिकरू माधवना

२२. × × अ × कु हे ×× वि ह गा र्त वाडी भाइनाक ठाडाइळी धरमा दाताळि मंगळ महेश रिपु/चु

२३. भावतु

**शिलालेखात उल्लेखित व्यक्तिनामे**

१. हंबीरराऊ – कोकणचक्रवर्ती राजा हंबीरराव ज्याच्या संदर्भात हा शिलालेख बनविण्यात आला .

२. सिहीप्रो – हंबीररावाचा मंत्री

३. नांदगाव मधील अधिकारी – भाई दातारू , अली समद, वरतकु (वर्तक)

४. दान केलेल्या व्यक्ती – राम जोईसि (जोशी), क्रिष्ण जोईसि (जोशी ), कुम जोईसि (जोशी)

५. इतर नावे – भाई वर्तक , भाई दातारू, गंगाधर भट , हरीमण पंडित, महापंडित ,सिरीदेव , दोदा दातारू, इ.

**शिलालेखात उल्लेखित ग्रामनामे**

१. नांदिगौ आगर – आताचे मुरुड तालुक्यातील नांदगाव , याच नांदगावचा उल्लेख “ग्रहलाघव” नंदीग्राम म्हणून आलेले आहे.

२. मरुड – मुरुड

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

३. चेउळ – चौल

**निष्कर्ष :**

शिलालेखाचे वाचन करताना , लेखात लिहिलेल्या २३ ओळींपैकी काही ठराविक शब्द किंवा ओळी वगळता उर्वरित शब्दांचे वाचन वरील लेखात दिले आहे. मानवी हस्तक्षेपामुळे किंवा नैसर्गिक कारणाने शिलालेखातील काही शब्द वाचण्यायोग्य नाहीत. ते वाचण्याचा प्रयत्न सुरु आहेत.

शिलालेखात उल्लेखित काळानुसार हा १४ व्या शतकातील शिलालेख असून कोकणात राज्य करणाऱ्या राजा हंबीररावांच्या राज्याच्या सीमेची नोंद सांगणारा पुरावा आहे. आतापर्यंत माहीम पासून नागाव पर्यंत मर्यादित असणारी हंबीररावांच्या राज्याची सीमा नांदगाव पर्यंत होती हे निश्चित होते. हा शिलालेख राजा हंबीररावांच्या उपलब्ध, अत्यल्प पुराव्यांमध्ये भर घालणारा तसेच उपलब्ध चार शिलालेखांत वाढीव असा पाचवा शिलालेख आहे. रायगड जिल्ह्यातील तालुका मुरुड मधील नांदगावच्या समुद्रकिनारी सापडलेल्या या शिलालेखाने नांदगावचे १४ व्या शतकातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व अधोरेखित होते.

आभार – शिलालेखाच्या वाचनात आणि अर्थ उलगडण्यात कु. प्रितम वाळंज व सौ. सहारा पाटील यांचे बहुमोल सहकार्य लाभले. शोधनिबंधाची मांडणी करण्याकरिता सौ. केतकी गुरव यांचे सहकार्य लाभले.

**संदर्भ सूची :**

१. द्राम – १२८० कवड्यांचा एक द्राम होत असे. (नागाव – आर्थिक व सामाजिक जीवन १७६०-१८४० , शां. वि.आवळसकर, पृ. १४६ )
२. 'प्राचीन मराठी कोरीव लेख'- शं. गो. तुळपुळे , लेख क्र.५५, ४६, ४१,४३, ४४, इ.
३. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, वा.वि. मिराशी - लेख क्र. ३२,३३,३८,३९
४. श्रीस्थानकाचे शिलाहार - रुपाली मोकाशी
५. THE REHLA OF IBN BATTUTA - Mahdi Husain, 1976
६. The Discovery of an Inscription of Hambirarao and Ancillary Archaeological Discoveries at Nandgaon, District Raigad ,Maharashtra, Kurush F Dalal, Abhijit Dandekar, Rhea Mitra-Dalal, Mugdha D Karnik, Prasad Gogate and Kunal Kini , Center for extra –Mural Studies , University Of Mumbai – june 2019
७. The BARC Inscription of Hambirrao (1368AD), Journal of AsiaticSocity of Mumbai,Vol 889 new series , suraj Pandit, Kurush Dalal, Abhijit Dandekar ,Prachi Moghe ,Vinayak Parab